# प्रकरण पाचवे

## उपसंहार

# प्रकरण पाचवे
# उपसंहार

आतापर्यंतच्या एकूण चार प्रकरणामध्ये योगीराज वाघमारे यांच्या 'पडझड' व 'धुराळा' या दोन कादंबरीच्या अनुषंगाने आपण सविस्तर अभ्यास केला. प्रस्तुत प्रकरणामध्ये आतापर्यंतच्या केलेल्या अभ्यासाचा स्थूल आढावा व त्यातून आलेले निष्कर्ष एकत्रितपणे या प्रकरणात मांडावयाचे आहेत.

प्रस्तुत लघुप्रबंधात "कादंबरी संकल्पना, दलित कादंबरीचे स्वरूप" या पहिल्या प्रकरणामध्ये 'कादंबरी संकल्पना व दलित कादंबरीचे स्वरूप' यांचा थोडक्यात आढावा घेतला आहे. कादंबरीची संकल्पना स्पष्ट करताना कादंबरीच्या उत्पत्तीचा अभ्यास केला आहे. कादंबरीच्या निश्चित उत्पत्तीबाबत काही विचारवंताच्या मतांचा आढावा घेण्यात आला आहे. कादंबरीच्या उत्पत्तीचे उत्तरदायित्व प्राचीन मराठी साहित्याकडे की इंग्रजी साहित्याकडे जाते याचा अभ्यास केला आहे.

इंग्रजीतील 'नॉव्हेल' या संज्ञेपासून 'कादंबरी' हा पर्यायी शब्द मराठीमध्ये वापरण्यात आला आहे. कादंबरीच्या निरनिराळ्या अंगावर व विशेषावर भर देण्याऱ्या काही निवडक विचारवंताच्या व्याख्यांचा अभ्यास यामध्ये केलेला आहे. त्यात मराठी, हिंदी व पाश्चत्य विचारवंताच्या व्याख्यांचा समावेश केला आहे. कादंबरीच्या संकल्पनेचा अभ्यास करीत असताना कादंबरी ज्या ज्या घटकांवरती अवलंबून असते, त्या घटकाचा थोडक्यात परामर्श घेतला आहे. कादंबरीचे घटक मांडताना 'कथानक, व्यक्तिरेखा, वातावरणनिर्मिती, संवाद, मनोविश्लेषण, भाषाशैली, संघर्ष' या घटकांचे कादंबरीत असणारे स्थान स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

मराठी कादंबरी लेखनाच्या वाटचालीची सुरूवात १८४१ साली जॉन बनियनच्या 'पिलग्रिम्स प्रोगेस' चे हरी केशवजी यांनी भाषांतर करून 'यात्रिकक्रमण' या

भाषांतरीत कादंबरीने झाली. याचे स्वरूप वर्णनपर निबंधासारखे आहे. या काळातील कादंबऱ्या भाषांतरीत होत्या. मराठीतील पहिली स्वतंत्र सामाजिक कादंबरी म्हणून बाबा पद्मनजी यांच्या 'यमुना पर्यटन' (१८५७) या कादंबरीचा उल्लेख केला जाते. त्यानंतर १८६१ साली लक्ष्मणशास्त्री हळबे यांनी 'मुक्तामाला' व १८६६ साली 'मंजुघोषा' या कादंबऱ्यांची निर्मिती केली. अशा प्रकारच्या अद्‌भुतरम्य कादंबऱ्या निर्माण झाल्या. त्यानंतर १८७१ मध्ये रा. भि. गुंजीकरांनी 'मोचनगड' ही मराठीतील पहिली ऐतिहासिक कादंबरी लिहीली. मराठीमध्ये या वळणावरच्या अनेक कादंबऱ्या निर्माण झाल्या.

त्यानंतर मराठी कादंबरीला कल्पनाविलासातून बाहेर काढून वास्तवाच्या पातळीवर आणण्याचे काम हरिभाऊ आपटे यांनी केले. त्यांनी १८८५ सालापासून कादंबरी क्षेत्रात सामाजिक, ऐतिहासिक अशा स्वरूपाच्या अनेक कादंबऱ्या लिहिल्या. मराठी कादंबरी व्यापक करण्याचा प्रयत्न हरिभाऊ आपटे यांनी केला. हरिभाऊ आपटे यांच्यानंतर वा. म. जोशी, श्री. व्यं. केतकर, न. चिं. केळकर यांनी कादंबरीची वाटचाल पुढे चालू ठेवली.

मराठी कादंबरीतील यापुढचे युग ना. सी. फडके व वि. स. खांडेकर यांनी सांभाळले. फडके-खांडेकरानी मराठी कादंबरी क्षेत्रात महत्त्वपूर्ण भर घातली. ना. सी. फडके यांनी 'कलेसाठी कला' व वि. स. खांडेकरांनी 'जीवनासाठी कला' या दृष्टिकोनातून कादंबऱ्या लिहिल्या. ना. सी. फडके यांनी मराठी कादंबरीला कल्पनारम्य सृष्टीत नेऊन ठेवले. तर वि. स. खांडेकरांनी प्रणयापेक्षा सामाजिक प्रश्नाला अधिक महत्त्व देऊन कादंबरीलेखन केले. त्यानंतर माडखोलकर, मामा वरेरकर, पु. य. देशपांडे यांनी कादंबरीक्षेत्र समृद्ध केले. याचसुमारास विभावरी शिरूरकरांनी मराठी कादंबरीत महत्त्वपूर्ण लेखन केले. याच काळात विविध प्रयोग हाताळणारे लेखक निर्माण झाले.

याचकाळात स्वांतत्र्योत्तर काळात मराठी साहित्यात अनेक प्रवाह निर्माण झाले. ग्रामीण, प्रादेशिक, दलित अशा स्वरूपाचे साहित्य निर्माण झाले. त्यातून ग्रामीण,

प्रादेशिक व दलित कादंबऱ्या निर्माण झाल्या. या कादंबरी क्षेत्रात विपुल असे लेखन होवू लागले.

फुले, आंबेडकर यांच्या प्रेरणेतून, विचारातून दलित साहित्यात लेखन होवू लागले. दलित साहित्यामध्ये कादंबरी हा प्रवाह फारसा प्रभावशाली ठरला नाही. तरीसुद्धा काही लेखकांनी त्याला समृद्ध करण्याचा प्रयत्न केला. अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात व नव्या पिढीतील उत्तम बंडू तुपे, भिमसेन देठे, नामदेव ढसाळ, योगेंद्र मेश्राम व योगीराज वाघमारे यांनी दलित कादंबरीक्षेत्राची वाटचाल पुढे चालू ठेवली.

'योगीराज वाघमारे–व्यक्ती व व्यक्तिमत्त्व' या दुसऱ्या प्रकरणात लेखकाचा जन्म, शिक्षण, कोटुंबिक स्थिती, संस्कार, स्वभाव, नोकरी आणि बढती याबद्दल थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे. 'येरमाळा' या छोट्याशा गावी जन्मलेल्या योगीराज वाघमारे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास या प्रकरणात केला आहे. घरची गरीब परिस्थिती असूनसुद्धा जिद्द व चिकाटीच्या बळावर त्यांनी आपले प्राथमिक ते बी. एड्, पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. तसेच त्यांच्या घरची कौटुंबिक स्थिती, घरातील व्यक्ती, त्यांचा रोजगार यांची माहिती सविस्तरपणे घेतली आहे. तसेच घरातील व्यक्तिंचे, मित्रांचे, शिक्षकांचे योगीराज वाघमारे यांच्यावरती जे संस्कार झाले त्यांचा आढावा घेतला आहे. तसेच त्यांचा स्वभाव, त्यांना वाचनाचा छंद कसा जडला, त्यांच्या पाठीमागे कोणाची प्रेरणा होती याचा अभ्यास केला आहे. गावाजवळील शिक्षकाच्या नोकरीपासून ते उच्चपदापर्यंतचा, नोकरी व बढतीचा प्रवास कसा झाला याचा परामर्श यात घेतला आहे. तसेच त्यांच्या लेखनविषयक जडणघडणीचा प्रवास, त्यांची साहित्यसंपदा, त्यांना मिळालेले पुरस्कार व त्यांच्या कादंबरी लेखन काळातील समकालीन दलित कादंबरीकार व त्यामध्ये योगीराज वाघमारे यांचे वेगळेपण याचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात केला आहे.

'पडझड', 'धुराळा' या कादंबरीतील सामाजिक आशय या तिसऱ्या प्रकरणामध्ये 'पडझड' व 'धुराळा' या कादंबरीतील सामाजिक आशय स्पष्ट केला आहे. या दोन्ही कादंबऱ्यातून योगीराज वाघमारे यांनी वेगळ्या विषयाची मांडणी करून समाजातील समस्येचा आढावा यामध्ये घेतला आहे. उपेक्षित लोकांची व्यथा-वेदना त्यांनी संयमपनाने व तटस्थवृत्तीने मांडली आहे. या दोन्ही कादंबऱ्या ग्रामीण भागात घडतात. त्यामुळे तेथे भेडसावणाऱ्या सामाजिक प्रश्नांचा उल्लेख कादंबरीत अविष्कृत झाला आहे.

'पडझड' या कादंबरीत पुर्वीच्या ग्रामसंस्कृतीची, ग्रामजीवनाची कशी पडझड झाली आहे याचा वेध घेतला आहे. दलित समाजात जन्माला आलेल्या योगीराज वाघमारे यांना लहानपणी जो परिसर लाभला तेथील व्यक्तीच्या व्यथा-वेदना व तेथील जीवन जगत असताना जे काही बरे-वाईट अनुभव लेखकांना आले त्यांचे यथार्थ दर्शन त्यांनी 'पडझड' या कादंबरीतून घडवले आहे.

नोकरीनिमित्त शहरात स्थायीक झालेले योगीराज वाघमारे यांना त्यांच्या गावातील प्राथमिक शाळेच्यावतीने विविध क्षेत्रातील कर्तबगार पुरूषांच्या सत्काराच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असते. अशा कार्यक्रमात सत्कारार्थी म्हणून लेखकाला निमंत्रण येते. त्या निमित्ताने लेखक गावी जातात त्यावेळी गावात झालेला बदल व सत्काराच्या ठिकाणच्या लोकांची नैतिकतेची पडझड या कादंबरीत प्रकर्षाने जाणवते.

'पडझड' ही कादंबरी सामाजिक आशयानी परिपूर्ण व प्रत्यक्ष वास्तवचित्रण याचे दर्शन करणारी आहे. लेखकानी भीमनगर व साठेनगर मध्ये झालेला बदल गावातील चंदू कांबळे च्या मदतीने एका-एका प्रसंगातून मांडतात. एक-एक घटनांचा व पात्रांचा उलगडा करीत कथानक पुढे सरकते. प्रत्येक व्यक्तिचित्रणातून त्यांनी सामाजिक प्रश्नांचा उहापोह केला आहे. गावकुसाबाहेर राहणारी माणसे, माणुसकीला आसुसली

आहेत पण माणूस म्हणून त्याच्याकडे कोणी पाहत नाहीत. मुक्या प्राण्यापेक्षाही हीनत्वाची वागणूक दिली जाते. अशा लोकांच्या व्यथा वेदनांचे प्रत्ययकारी दर्शन 'पडझड' या कादंबरीतून घडते.

सवर्ण समाज दलित समाजाकडे कशा दृष्टिकोनातून पाहतो याचा प्रत्यय नागनाथ तात्याच्या दर्शनातून नजरेस येतो. तसेच मारूती मांग व पोलिस पाटील यांच्या घटनाप्रसंगातून लेखकानी समाजामधील शोषक व शोषित यांच्यातील संघर्ष कादंबरीत मांडला आहे. तसेच सवर्ण समाजातील लोक आपल्या भागाचा कसा विकास करून घेतात व गावाबाहेर राहणाऱ्या दलितांना सुधारणापासून कसे वंचित ठेवतात याचे प्रत्ययकारी चित्रण 'पडझड' या कादंबरीत केले आहे. लेखक चंदू कांबळेला सोबत घेवून भीमनगर व साठेनगरमधील लोकजीवन व व्यक्तिंचा आलेख यांचा आढावा घेतला आहे. भारतीय सैनिक शेटीबादादा या व्यक्तिरेखेतून भारतीय सैनिकाला समाजात कितपत प्रतिष्ठा आहे त्यांचे जीवन कसे असते याची माहिती मिळते. शेटीबादादाच्या वाट्याला मृत्यू कसा येतो याचे दाहक चित्रण लेखक या कादंबरीतून घडवितो. 'पडझड' या कादंबरीत दलित स्त्रियांच्या समस्यांचा आढावा घेण्यात आला. दलित स्त्रियांना गाव व समाज अशा दोन्ही पातळीवर संघर्ष करावा लागतो. तिची गावाकडून व दलित समाजाकडून सतत उपेक्षाच होत असते. याचा प्रत्यय दर्शवणारी 'सरू' ही व्यक्तिरेखा महत्त्वपूर्ण ठरते. नवरा चुकीच्या वाटेने जात असेल तर त्याला फटकारण्याची ताकद इथल्या स्त्रियांमध्ये आहे. अशा स्त्रियांचे दर्शन या कादंबरीत घडते. आंबेडकरांच्या तत्वज्ञानामुळे दलित समाज हा अंधश्रद्धेपासून दूर जात आहे. व त्यांची देवावरील निष्ठा कमी होत आहे. याचे प्रभावशाली दर्शन या कादंबरीत घडते.

समाजामध्ये स्वार्थी लोक खूप आहेत असे स्वार्थी लोक आपला फायदा करून घेण्यासाठी खोटे बोलून लोकांना फसवतात अशा लोकांचा उल्लेख एस. आर. पी. चा जवान व थोरले पाटील यांच्याद्वारे कादंबरीत अविष्कृत होते. दलित समाजातील

भावकी, जातपंचायतीचे दर्शन, रितीरीवाज, रझाकारांचा हल्ला, नामांतराचा लढा अशा अनेक घटनांचे दर्शन कादंबरीत घडते. दिवसभर गावाची 'पडझड' पाहिल्यानंतर कार्यक्रमाच्या ठिकाणी माणसाच्या नैतिकतेची पडझड कशी झाली आहे हे दाखविण्यात लेखक यशस्वी झाले आहेत. त्यांचा जाणूनबुजून सत्कार केला जात नाही. दलित माणूस कितीही शिकला तरी तो जातीमुळे मागे राहतो. याचा प्रत्यय कादंबरीतून घडतो. शेवटी भीमनगरमधील मुले लेखकाचा सत्कार करतात. त्यामुळे ही कादंबरी दलितामधील वैचारीकता त्यांच्यात आलेले आत्मभान चित्रीत करते.

'धुराळा' या कादंबरीत लेखकाने एक वेगळा विषय हाताळला आहे. या कादंबरीतून दलित कुटुंबातील ऊसतोडणी कामगाराचे जीवन त्यांच्या व्यथावेदनांचे प्रत्त्ययकारी चित्रण केले आहे. या कादंबरीचा नायक सुदामा हा चार पैशांच्या लोभापायी ऊसतोड करण्यासाठी फॅक्टरीवर जातो व आपले आयूष्य कसे उध्वस्त करून घेतो याचे प्रभावशाली चित्रण या कादंबरीतून घडते. सुदामाची पंधरा एकर शेती व बैलजोडी असते. इतके असुन सुध्दा तो खूप आळशी असतो. त्याचे वडील नाना हे कष्टाळू स्वभावाचे असतात. नानानंतर सुदामावर घरची जबाबदारी पडते. त्या काळात फॅक्टरीचा मुकादम त्रिंबकराव याची सुदामाशी गाठभेट होते. व त्रिंबकरावाच्या अमिषाला बळी पडून तो ऊस तोडणीचे काम करण्यास तयार होतो. यातून शेतीवाडी असणाऱ्या सुदामासारख्या व्यक्तिमुळे खेडी ओस पडत आहेत. याचा प्रत्यय या कादंबरीतून घडतो. ग्रामीण भागातील स्त्रियांच्या स्वभावाचे दर्शन 'धुराळा' या कादंबरीत येते. घरची शेतीवाडी सोडून फॅक्टरीवर जाणाऱ्या सुदामाला विरोध करणारी, प्रसंगी समजावून सांगणारी मालन, यातून अस्सल ग्रामीण स्त्रीचे दर्शन घडते.

ग्रामीण भागातील लोक साध्या भोळ्या स्वभावाचे असतात अशा भोळ्या लोकांना पैशाचे अमिष दाखवून आपला स्वार्थ साधणारा मुकादम नजरेस येतो. तसेच तेथील लोकांच्या मनामध्ये देवाबद्दल अपार निष्ठा असते. याचे दर्शन कादंबरीत घडते.

पैसा हा उद्दिष्ट ठेवून फॅक्टरीवर गेलेल्या लोकांच्या हालअपेष्टाचे चित्रण कादंबरीत येते. फॅक्टरीवर हॉटेल चालवणारा चिच्या ही एक महत्त्वपूर्ण व्यक्तिरेखा आहे. ऊसतोडणी कामगारांच्या बायकांचे, मुलांचे. जनावरांचे कसे अतोनात हाल होते व अपार कष्ट घेऊनही ते कसे कर्जबाजारी होतात याचे दर्शन कादंबरीत घडते. समाजातील भांडवलदार लोक आपल्या पैशाच्या जोरावर गरीब लोकांचे कसे शोषण करतात व त्यांच्या बायकांकडे कोणत्या नजरेने पाहतात याचे दर्शन मालनवरील अतिप्रसंगाने निदर्शनास येते. फॅक्टरीवरील मुकादम, मालक यांच्या स्वभावाचे दर्शन घडते. ग्रामीण भागातील माणूस हा आपल्या जीवापेक्षा आपल्या इज्जतीला जपतो. प्रसंगी तो खुनही करू शकतो. याचे दाहक चित्रण 'धुराळा' या कादंबरीतून घडते.

ऊसतोडणी कामगारांच्या जीवनातील व्यथावेदनांचे दर्शन या कादंबरीतून घडते. निरागस, प्रामाणीक, साध्याभोळ्या सुदामाच्या जीवनाची कर्मकहाणी व फटकरीने केलेला त्याच्या जीवनाचा धुराळा म्हणजे सदर कादंबरी होय.

चौथ्या प्रकरणात 'पडझड' व 'धुराळा' या कादंबरीतील वाङ्मयीन अभिव्यक्ती :- व्यक्तिचित्रणे, प्रसंगनिर्मिती, वातावरण निर्मिती, निवेदनपद्धती, भाषाशैली या घटकांचा अभ्यास केला आहे. पडझड कादंबरीतील व्यक्तिचित्रणे अत्यंत प्रभावी आहे. योगीराज वाघमारे यांनी व्यक्तिचित्रणाच्या आधारे गावाची, समाजाची, नैतिकतेची पडझड कशी झाली आहे हे कादंबरीतून मांडतात. पडझडमधील व्यक्तिरेखातून लेखकाने त्या व्यक्तिंचा जीवनालेख मांडला आहे. नागनाथ तात्या, मारूती मांग, शेटीबादादा, नाना सरू, अनुसया, भीवदादा अशा अनेक व्यक्तिरेखांचा अभ्यास या प्रकरणात केला आहे. प्रत्येक व्यक्तिरेखांचा स्वभाव त्यांच्या व्यथावेदनांचे दर्शन कादंबरीतून घडते. 'धुराळा' या कादंबरीतील व्यक्तिरेखा या महत्त्वपूर्ण ठरतात. ऊस तोडणी कामगाराच्या जीवनावर आधारीत ही कादंबरी आहे. त्यामुळे कथानकास अनुसरून पात्रांची निर्मिती झालेली आहे. यामुळे ही कादंबरी समृद्ध व वाचनीय ठरते. दलित कुटुंबातील सुदामा हा

या कादंबरीचा नायक आहे. सुदामा ही व्यक्तिरेखा कादंबरीच्या सुरूवातीपासून शेवटपर्यंत नजरेस येते. तसेच मालन, त्रिंबकराव, नाना, गबरू, हॉटेलमालक, चिच्या या व्यक्तिरेखामुळे ही कादंबरी प्रभावशाली ठरते.

'पडझड' व 'धुराळा' या कादंबरीतील व्यक्तिरेखा वाचकांच्या मनात दीर्घकाळ रेंगाळतात. तर काही व्यक्तिरेखा मनात खोलवर ठसतात. अनेक बारकाव्यासह लेखकाने व्यक्तिरेखांचे दर्शन घडविले आहे. व्यक्तिरेखांचे परिणामकारक चित्रण करण्यात लेखक यशस्वी झाले आहेत.

'पडझड' व 'धुराळा' या कादंबरीत येणारे प्रसंग कथानकाशी व आशयाशी एकरूप झालेले दिसतात. या कादंबरीतील प्रसंग हे प्रत्यक्ष समोर घडत आहेत असे वाटते. अशी परिणामकारक प्रसंगनिर्मिती साधून कादंबरीला नेमकेपणा प्राप्त करून देतात. 'पडझड' व 'धुराळा' या कादंबरीतील नेमक्या वातावरण निर्मितीमुळे कादंबरी ही परिणामकारक ठरते. या कादंबरीतील व्यक्तिरेखांना जिवंत करण्यासाठी वातावरणनिर्मितीचा फार मोठा वाटा आहे. तसेच ग्रामीण भागाचे यथार्थ दर्शन घडविण्यासाठी व फॅक्टरीचा परिसर जीवंत करण्यासाठी कादंबरीतील वातावरणनिर्मिती महत्त्वपूर्ण ठरते. 'पडझड' या आत्मनिवेदनात्मक कादंबरीसाठी प्रथमपुरूषी निवेदन पद्धती व 'धुराळा' या कादंबरीसाठी सर्वसाक्षी, सर्वज्ञ अशी तृतीयपुरूषी निवेदनपद्धतीचा वापर केला आहे. 'पडझड' व 'धुराळा' या कादंबरीच्या भाषाशैलीत लातूर व सोलापूर सिमारेषेवर बोलल्या जाणाऱ्या बोलीभाषेबरोबरच प्रमाणभाषेचाही वापर केला आहे. ग्रामीण व नागरी अशा मिश्र स्वरूपाची निवेदनाची भाषा आलेली आढळते. संवादाचा परिणामकारक वापर करून कादंबरीतील व्यक्तिरेखा जीवंत केल्या आहेत. कादंबरीमध्ये ग्रामीण बोलीतील म्हणी व वाक्यप्रचाराचा वापर केल्यामुळे कादंबरीस गतीमानता प्राप्त होते. निवेदनात छोट्या-छोट्या वाक्यांचा वापर केलेल्या कादंबरीस नेमकेपणा येण्यास मदत होते. तसेच समर्पक प्रतिमा, उपमा, ग्रामीण भागातील अस्सल शिव्या, ध्वनिदर्शक

शब्द, ग्रामीण भागात रूढ असलेले शब्द, इंग्रजी व हिंदी शब्दांचा यथायोग्य वापर केल्यामुळे 'पडझड' व 'धुराळा' या कादंबऱ्यातील भाषा प्रभावशाली ठरताना दिसते. या सर्वघटकांमुळे योगीराज वाघमारे यांचे कादंबरीलेखन अभिव्यक्तिदृष्ट्या परिपूर्ण बनले आहे. अशा पद्धतीने चार प्रकरणांचा स्थूल आढावा पाहिल्यानंतर त्यातून आलेले निष्कर्ष पाहूया.

**निष्कर्ष**

१) प्रस्तुत लघुप्रबंधातून थोर कथाकार श्री. योगीराज वाघमारे यांच्या कादंबरी वाङ्मयाचा अभ्यास करता आला. श्री. योगीराज वाघमारे मराठी साहित्यक्षेत्रात कथाकार म्हणूनच सुपरिचीत आहेत. त्यांच्या मोजक्याच कादंबऱ्या आहेत. परंतु त्या दर्जेदार व वाङ्मयीन गुणांनी परीपूर्ण आहेत. 'सभापती', 'पडझड', 'धुराळा' इ. कादंबरी प्रकाशीत आहेत. त्यातील 'पडझड', व 'धुराळा' या कादंबऱ्यातून त्यांनी दलित समाजजीवनातील 'पडझड', व 'फटकरी' अर्थात उसतोडणी कामगार म्हणून काम करणाऱ्या दलित माणसाच्या विषयी समस्या मांडल्या आहेत. प्रस्तुत कादंबऱ्या ह्या दलित कादंबऱ्या म्हणूनच अभ्यास करावा लागतो. परंतू आजपर्यंतच्या दलित कादंबरीच्या ढाच्यापेक्षा वेगळ्या धाटणीच्या कादंबऱ्या म्हणून त्यांची दलित साहित्य क्षेत्रात नोंद घ्यावी लागते.

२) योगीराज वाघमारे यांनी दलित समाजाच्या व्यथावेदनांच्या बरोबरीने सांस्कृतिक जीवनाचे चित्रण केले आहे. खेडी बदलली, गावं ओस पडू लागली, खेड्यातील माणूस जगण्यासाठी शहराकडे वळू लागला, खेडेगावाची 'पडझड' सुरू झाली. जुनं सर्व नष्ट झाले. लेखक म्हणतो, "सत्काराच्या निमित्ताने गावात गेलो तेव्हा सारा गाव बदलला होता. दलित समाजात ही पडझड झाली होती, माणसं बदलली व समाज जीवन भकास झाले होते." माणसाची नैतिकता बदलली परंतु दलित समाजात मात्र ती 'नैतिकता', 'आपलेपणा' लेखकाला जाणवतो.

'पडझड' लेखकाने मानवी जीवनातील सांस्कृतिक,सामाजिक, आर्थिक, पडझड चित्रित केली आहे. आजपर्यंच्या दलित कादंबरी आशयापेक्षा वेगळा आशय लेखकाने मांडला आहे.

३) 'धुराळा' मध्येतर लेखकाने दलित समाजातील लोक कष्ट करून, पोट भरण्यासाठी साखर कारखान्यावर ऊस तोडणी कामगार म्हणून जातात व तिथे त्यांचे काय परवड होते याचे मनाला पिळ पडणारे चित्रण केले आहे. अर्थात दोन्ही कादंबरीतून लेखकाने पारंपारिक दलित आशयापेक्षा ज्वलंत प्रश्नांची मांडणी केली आहे.

४) 'उस्मानाबाद', 'बीड' जिल्ह्यातील ऊस तोडणी कामगार हे (मराठा आहेत) त्याच्याकडे शेती आहे. बैलजोडी आहे. परंतु निसर्गाची अवकृपा झाल्यामुळे ही मंडळी उसतोडणी कामगार म्हणून वर पश्चिम महाराष्ट्रात येतात. त्याचबरोबर दलित समाजातील लोक उसतोडणी कामगार म्हणून काम करतात. गावात सर्वणाकडून अन्याय सहन करावा लागतो. तसेच पोटभरण्यासाठी साखर कारखान्यावर आल्यावर तिथेही 'मुकादम', त्यांचे गुंड दलितांच्या सुंदर दिसणाऱ्या आया, बहिणीवर अन्याय करतात. त्याचे पिळ पाडणारे दर्शन योगीराज वाघमारे प्रस्तुत कादंबऱ्यातून करतात. हे 'धुराळा' कादंबरीचे यश आहे.

५) आजपर्यंतच्या दलित कादंबऱ्यातील आशयापेक्षा वेगळा आशय घेवून वाघमारे साहेबांनी दलित समाजाच्या अन्याय, अत्याचाराचा, वेगळा पैलू या कादंबऱ्यात दर्शविला आहे. हे त्यांचे वेगळेपण आहे. त्यांच्या समकालीन लेखन करणाऱ्या लेखकांच्यामध्ये योगीराज वाघमारे हे शांत, संयमी व धीरगंभीर स्वभावाचे लेखक आहेत. त्यानुसार ते पारंपरिक अन्याचा पाढा वाचत बसत नाहीत तर आत्म टिकाही करतात. दलित समाजातील होणारी 'पडझड' उसतोडणी कामगाराच्या प्रश्नाबरोबर मांडतात.

६) सोलापूर-लातूर सिमारेषेवर बोलढली जाणारी बोली भाषेचा पुरेपुर वापर केला आहे. याचबरोबर म्हणी, वाक्यप्रचार, संवाद, प्रसंगनिर्मिती, वातावरणनिर्मिती, त्या-त्या परिसरातील जीवन ठसे व विशिष्ट जातीतील स्वभावचित्रणे, व्यक्तिचित्रणे इत्यादींचा वापर करून दोन्ही कादंबऱ्या सामाजिक आशयाच्या अंगाने दर्जेदार व वाङ्मयीन मूल्यांनी परिपूर्ण झाला आहे. दोन्ही कादंबऱ्यातून दलित जीवनाचे त्यांच्या व्यवसायाचे सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक जीवनाचे प्रत्ययकारी दर्शन घडविले आहे. या दोन कादंबऱ्या दलित कादंबरी वाङ्मयात मोलाची भर घालतील यात शंका नाही. अशा तऱ्हेने प्रस्तुत लघुप्रबंधातून अभ्यासअंती हाती आलेले निष्कर्ष नोंदविता येतील.